**महाराष्ट राज्य विद्युत वितरण कंपनी लि.**
**कोकण परिमंडळ कार्यालय**
**ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी**

---

**ग्राहक तक्रार क्र. ३२/२००९** **दि. ०२/०२ /२००९**

१) श्री. सुभाष वामनराव सांवत वट मुखत्यारपत्र
धारक मयत ग्राहक -
श्रीमती. रमाबाई माधवराव सावंत
३४१२ अ, झाडगांव, मुरूग
ता. जि. रत्नागिरी.
} तक्रारदार ग्राहक

*विरुध्द*

१) कार्यकारी अभियंता
स व सु विभाग,
विभागिय कार्यालय रत्नागिरी.
} विरुध्द पक्षकार

फोरम उपस्थिती }
१) श्री. डि. एस्. जामखेडकर
अध्यक्ष
२) श्री. जे.एल. सोनवणे
कार्यकारी अभियंता
व सचिव
३) श्री.एन.ए.कुलकर्णी
सदस्य

ग्राहकाच्या वतीने } वट मुखत्यार पत्र धारक -
सुभाष वामनराव सावंत

| | | |
|---|---|---|
| **विरुध्द पक्षकाराच्या वतीने** | } | **१) कार्यकारी अभियंता (प्रशासन) रत्नागिरी श्री. डी. एस्. कांबळे**<br><br>**२) सहा. अभियंता कार्यालय रत्नागिरी श्री. नारायण वामन आजगांवकर**<br><br>**३)कनिष्ठ अभियंता रत्ना. (श.) उपविभाग.** |

**महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग ग्राहक तक्रार निवारण मंच व लोकपाल(ओम्बुडसन) विनिमय २००३ मधील ८(२) चे तरतुदीनसार :**

सदरहू तक्रार प्रकरणात मयत वीज ग्राहक रमाबाई माधवराव सावंत याच्यावतीने त्यांच्या जागेतील कूळ विष्णू सिताराम नागवेकर यांच्याकडून देण्यात आलेल्या वट मुखत्यार पत्रानुसार तक्रार दाखल करण्यात आली असून यामध्ये प्रामुख्याने वीज मीटरचे स्थलातंर आणि अनाधिकृत वीज पुरवठयाचा वापर याबाबत तक्रार उद्‌भवली असून संबधित वट मुखत्यार धारक सुभाष वामनराव सांवत यानी आवश्यक त्या तपशिलासह तक्रार दाखल केली असून ती विहीत नमुन्यात आहे. तक्रार दाखल होताच मंचाकडील पत्र क्रमांक २२८ दि. १७.०२.०९ च्या पत्रानुसार कार्यकारी अभियंता महावितरण विभागिय कार्यालय रत्नागिरी यांचे कडून स्पष्टीकरण /खुलासा मागविण्यात आला असता विभागिय कार्यालयाने त्यांच्याकडील पत्र क्रमांक १३०५ दि. ६ मार्च २००९ च्या पत्राने आवश्यक तो तपशिल मंचाकडे दाखल केला असून तक्रार प्रकरणाची १८ मार्च २००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. उभय बाजूनी आपला युक्तीवाद करून आपल्या म्हणण्याच्या अनुषंगाने अधिक तपशिल ही दाखल केला.

ग्राहकांच्यावतीने दाखल करण्यात आलेल्या तक्रारीचे स्वरूप असे की, A.G.११७१ शेती पंप आणि आर-११७२ घरगुती वापराचा मीटर तसेच या बाबतची जमिन मिळकत मुन्सीपल घर नं. ३४११ यातील सर्व जमीन धारक व वीज ग्राहक मयत झालेमुळे मालकी हक्क आणि त्याचे वारसदार यांच्यामध्ये तंटा उद्‌भवल्याने तक्रारीस सुरूवात झालेली आहे. सदरहू जागेत सिताराम लक्ष्मण नागवेकर आणि त्याचे वारस विष्णू सिताराम नागवेकर हे कूळ वहिवाटदार असून १९६५ सालापासून श्रीमती रमाबाई माधवराव सांवत याचे नांवे A.G. ११७१ मीटर ने वीज उपलब्ध केलेपासून वीज पुरवठा सातत्याने करण्यात आलेला आहे. दरम्यानच्या काळात मयत ग्राहक रमाबाई सावंत याचे वारस आणि संबंधितामध्ये मालमत्तेवरून मतभेद उदभवल्याने प्रकरण मालकी हक्काबाबत मे. कोर्टामध्ये दाखल झालेले आहे. प्रकरणातील मुन्सीपल घर नं. ३४११ सध्या असतित्वात नाही तथापि प्रस्तुत दिवाणी कोर्टातील दावा मिळकतीतील A.G.११७१ शेती पंप आणि आर- ११७२ व आर- २५७२ घरगुती वापर इ.वीज पुरवठा चालू असून श्री. सावंताच्या म्हणण्यानुसार सदरहू मीटरचे स्थंलातर आणि वीज पुरवठा बेकायदेशीर असून सदर मीटरचे स्थंलातर तसेच पुनर जोडणी बेकायदेशीर आहे. मीटर क्रमांक ११७१ व मीटर क्र. ११७२ याचे स्थंलातर महावितरणच्या संमतीने झाले असून यास प्रामुख्याने संबंधित वारस आणि प्रामुख्याने दिलीप शंकर तावडे जबाबदार आहेत. आर २५७२ हा मीटरही याच पध्दतीने स्थलांतर झालेले आहे. याप्रकरणातच अंतर्गत ग्राहक कक्षाने आरोप फेटाळल्यानंतर मंचाकडे तक्रार केली असता मीटरचे स्थलांतर नियमबाहय आहे असे मत देवून जबाबदार कर्मचाऱ्याच्यावर कारवाई करण्याचा आदेशही दिला होता तथापि आज तागायत A.G.११७१,११७२ R- २५७२ या मीटरचा वीज पुरवठा चालू ठेवण्यात

आला असून महावितरणने वीज अधिनियम २००३ मधील कलम १५० नुसार संबंधिताचा अपराध असतानाही महावितरणने मुक संमती दिलेली आहे. यामुळे आमच्या ग्राहक हक्कांची आणि नैसर्गिक न्यायाची पायमल्ली झाली असून हा अनाधिकृत वीज पुरवठा खंडीत करण्यासाठी आदेश देण्यात यावा.

सदर प्रकरणात दिलीप शंकर तावडे यानी आपले म्हणणे दि. ६.०३.२००९ रोजी दाखल केले असून सदर बाबतीत आपले म्हणणे ऐकून निर्णय दयावा अशी विनंती करण्यात आली आहे. श्री. तावडे यांनी दिवाणी अपिल नं. ६३/२००८ दाखल केला असून यातील अपिल नं. ८३/२००८ ची आदेशाची प्रत सोबत जोडली आहे. दिलीप शंकर तावडे यांच्या म्हणण्यानुसार मयत ग्राहकांच्या मालमत्ते संदर्भातील दावा रे.मु.नं. २०४/२००३ या दाव्यातील आदेशाला वरिष्ठ न्यायालयाकडून दि. २३.१०.०८ रोजी स्थगिती आदेश मिळाला आहे त्यामुळे कोणतीही कार्यवाही होवू नये. संबधित तावडे यांनी महावितरणकडे ०९.०२.०६ पासून A.G. ११७१ व R-११७२ हस्तातंराचा प्रस्ताव दिला असून मीटर नावे करून देण्याविषयी कळविले आहे. सुनावणी कालावधीत वटमुखत्यार धारक यानी दिलीप शंकर तावडे यांचे अतिक्रमण, मीटरचे स्थलातंर, नविन बांधकाम, विजेचा वापर इत्यादि मुद्दे मांडले असून स्थलांतर झालेले तीनहि मीटर बेकायदेशीर असल्याचे स्पष्ट करून गट क्रमांक १६०, १६१अ,१६०ब आणि १६१ब बाबत उतारे कोर्टात दाखल केलेले आहेत. श्री. सावंत यांच्या म्हणण्यानुसार दिवाणी कोर्टातील दावा क्रमांक २०४/२००३ आणि दिवाणी अपिल क्रमांक ८३/२००८ यातील वादी प्रतीवादी यांचा A.G.११७१ या मीटरच्या वीजपुरवठयाशी कोणताही हक्क संबंध नाही आणि ते महावितरणचे कायदेशीर ग्राहक नाहीत त्यामुळे जिल्हा न्यायालयाच्या स्थगितीच्या आदेशाचा संबंध वीज पुरवठयाशी जोडण्याचे कारण नाही आणि या अनाधिकृत मीटर बाबत वीज अधिनियम २००३ चे कलम १३५,१३६ आणि१२६ अन्वये गुन्हे केले असून कोर्टातील वादाचा या कार्यालयाशी संबंध नसल्याचे स्पष्ट केलेले आहे. मंचाकडे दाखल झालेला हूकूमनामा निशाण क्रमांक ७५ रे.मु.नं. २०४/२००३ या प्रकरणातील असून त्यांचा वीज पुरवठयाशी काहीही संबंध नाही. सदर दिवाणी वादात सुभाष वामनराव सांवत यांचे केवळ प्रतिज्ञापत्र असून त्याची प्रत मंचाकडे दाखल करण्यात आलेली आहे.

सुनावणी कलावधीत महावितरणच्या म्हणण्यानुसार मंचाकडे केस क्र. ८/२००६ यामध्ये आदेश झाले असून मिळकतीच्या हक्काबाबत दिवाणी कोर्टात दावा चालू असल्याने कोणताही निर्णय घेणे उचित ठरणार नाही. त्यामुळे श्री. तावडे यांचाही हस्तांतरण / नांव बदलाबाबतचा प्रस्ताव स्थगित असल्याचे स्पष्ट केले.संबधित वीज पुरवठयाचे लाभार्थी तावडे असल्याने वीज पुरवठा चालू ठेवण्याचे स्पष्ट केरून मंचाने दि. ०४.९.२००६ रोजी दिलेल्या आदेशाचे पालन करण्यात आल्याचे स्पष्ट केले आणि संबधित प्रकरणातील दाखल केलेली कागदपत्रे स्पष्ट केली. महावितरणच्या म्हणण्यानुसार त्यावेळच्या परिस्थितीप्रमाणे मीटरचे स्थलातंर झाले असून, करण्यात येत असलेला पुरवठा हा पुर्णपणे कायदेशीर आहे. वीज विधेयक २००३ मधील कोणत्याही तरतुदीचे उल्लघंन झाले नसून पुरवठादार या नात्याने ग्राहकाचा वीज पुरवठा चालू ठेवण्याचे स्पष्ट केले आहे. सदरहू प्रकरणात महावितरणची कृती पुर्णपणे नियमानुसार असून मालकी हक्काचा वाद न्याय प्रविष्ठ असल्याने मयत ग्राहकांच्या नांव बदलाबाबत निर्णय घेतला नसल्याचे नमुद केले आहे. उभय बाजूना मुदत दिल्यानंतर ३० मार्च रोजी संबंधितांनी आवश्यक ती सर्व कागदपत्रे दाखल केली असून प्रकरणातील मालकी हक्कोची गुतांगुत लक्षात घेता मंचाने प्रत्यक्ष जागेवर जावून सर्व वस्तुस्थितीची आणि संबंधित मीटरची पहाणी केली. दि. १.०४२००९ रोजी केलेल्या पाहाणीत महावितरणने प्रत्यक्ष वस्तुस्थिती दाखवून श्री. तावडे आणि संबंधितानी उपस्थित राहून मीटरचे स्थंलातंर, सध्याची जागा व करण्यात आलेले आवश्यक फेरफार यांची माहिती दिली.

या तकार प्रकरणात वेगवेगळे मुद्दे उद्भवले असल्याने आणि उभय बाजूनी कागदपत्राची पुर्तता बरीच लाबंल्याने तसेच प्रत्यक्ष जाग्यावर जावून पहाणी आणि प्रकरणाचा काही भाग न्याय प्रविष्ठ असल्यानें तसेच मयत ग्राहक रमाबाई सावंत यांच्या वारसदारांची या तकारीच्या अनुषंगाने महत्वाची कागदपत्रे दाखल करण्यास अवधी मागितल्याने व तकारीतील अन्य गुतांगुत लक्षात घेता दोन महिन्याच्या कालावधित म्हणजेच केस दाखल केल्यापासून म्हणजेच (१७.०२.०९ पासून १७.०४.०९ पर्यंत निर्णय देणे नियमानुसार अभिप्रेत असताना सर्व तपशील मे २००९

पर्यंत उपलब्ध होवू शकला आणि त्यामुळेच मंच हा निर्णय जुनच्या आत देवू शकत नव्हते न्याय प्रविष्ठ असलेल्या बाबी तसेच मंचासमोर उपलब्ध झालेली कागदपत्रे व त्यांची शहानिशा इत्यादिमुळे विहित कालावधीपेक्षा अधिक अवधी या प्रकरणास लागला आहे की ज्यामुळे निर्णय प्रकीया थोडया विलंबाने घ्यावी लागली.

तक्रार प्रकरणात दाखल करण्यात आलेली कागदपत्रे, उभय बाजूनी केलेले युक्तीवाद व तक्रारीच्या अनुषंगाने उपलब्ध झालेले अन्य तपशील आणि प्रत्यक्ष जागेवरील वस्तुस्थिती पाहता आणि माननीय जिल्हा स्तरावरील न्यायालयाने दिलेली स्थगिती विचारात घेता उपस्थित झालेल्या तकारीबाबत विज विधेयक २००३ मधील तरतुदी नुसार याबाबी मंचाच्या कार्यक्षेत्रात येत नाहीत असे मंचाचे स्पष्ट मत असून तक्रारीच्या अन्य मुद्दयाबाबत या मंच्यासमोर वट मुखत्यार पत्र धारक कुळ वहिवाटदार विष्णू सिताराम नागवेकर- कूळ -मुळ मयत ग्राहक-रमाबाई माधवराव सावंत यांच्यावतीने ग्राहक तक्रार क्रमांक ०८/२००६ या तक्रार प्रकरणात यांच फोरमने दि. ४ संप्टेबंर २००६ रोजी निर्णय दिला असून त्यातील आदेश कमांक एक, दोन आणि तीन बाबतची कार्यवाही महावितरणने केली असून तसा अहवाल ही दाखल झालेला आहे. महावितरणच्या मुळ ग्राहक रमाबाई माधवराव सावंत या मयत झ ाल्यानंतर त्याचे कायदेशीर वारस व संबंधित मालमत्तेबाबत प्रकरण न्याय प्रविष्ट झाल्याने तसेच जिल्हास्तरीय न्यायालयाकडून स्थगिती आदेश असल्याने मंचाच्या मुळ आदेश दि. ४.०९.२००६ नुसार आदेश कमांक चारची कार्यवाही होऊ शकलेली नाही हि वस्तुस्थिती आहे. मयत ग्राहकांचे वारसदार आणि संबधित मालमत्तेबाबत की ज्याठीकाणी मीटर क. ११७१, ११७२, आणि मीटर क. २५७२ अस्तीत्वात आहेत. मीटरचे स्थलातंर यापूर्वीच झालेले असल्याने आणि प्रत्यक्ष वस्तुस्थिती पाहता ते योग्य ठिकाणी असून अदयाप त्यांच्या मालकी हक्कांत कोणताही बदल झालेला नाही. वीज वापराची बीले मयत ग्राहक रमाबाई सावंत यांच्या नावांने दिली जातात आणि त्याचा भरणा लाभार्थी या नात्याने दिलीप शंकर तावडे याच्यांकडून केला जातो. महावितरणने मान्य केल्यानुसार आणि दाखल केलेले लेखीपत्र दि. ३०.३.०९ नुसार A.G.११७१, R-११७२ व R- २५७२ या मीटर आणि ग्राहकांबाबत कागदपत्रे उपलब्ध होऊ शकली नाहीत. तथापी आर -२५७२ यांचे बील ग्राहक कमांक २१००१००२५७२३ यसप्रमाणे दिलीप शंकर तावडे यानांवाने काढण्यात आले असून A.G.११७१ आर- २५७२ ग्राहक कमांक २१००१००११७१४ आणि ग्राहक कमांक २१००१००११७२२ हि मयत ग्राहक रमाबाई माधवराव सावंत याच्यां नावांने मुरूगवाडा, रत्नागिरी या पूर्वीच्या पत्त्यावर दिली जातात. ग्राहक मयत झाल्यानंतर २० वर्षाचा कालावधी लोटला असून या कालावधीत कोणताच निर्णय न लागल्याने हस्तांतरण होऊ शकलेले नाही. या विलंबास मयत ग्राहकाचे वारसदार व महावितरण जबाबदार असून उभय बाजूनी या विलंबाचे कोणतेही कारण देण्यात आलेले नसून कोर्टाची स्थगिती हि बाब हि संयुक्तीक ठरलेली नाही. मा. जिल्हास्तरावरील न्यायमंचाचा स्थगिती आदेश लक्षात घेता. याबाबतीत कोणतेही भाष्य करणे यास्थितीत योग्य वाटत नाही. या प्रकरणातील प्रस्तुत दावा हा दिलीप शंकर तावडे विरूध्द कूळ विष्णू सिताराम नागवेकर या उभयतातअसून या दाव्याचा तकार प्रकरणाशी संबंध येत नाही. तथापि सुभाष वामनराव सावंत हे वट मुखत्यार पत्र धारक म्हणून कूळ श्री. नागवेकर यांच्यावतीने तकारीचा पाठपुरावा करीत असल्याने त्यानी या प्रकरणात सर्व ती कागदपत्रे दाखल केलेली आहेत तथापि श्री. सुभाष वामनराव सावंत हे कोठेही वारस अथवा मालमत्तेच्या संदर्भात पार्टी म्हणून आहेत की नाही हे स्पष्ट झालेले नाही कुळाच्या वतीने त्यानी उपस्थित केलेल्या अन्य हरकती अ प्रस्तुत तसेच वस्तुस्थितीशी सुसंगत नसल्याने त्या फेटाळणेच योग्य ठरेल असे मंचाचे स्पष्ट मत आहे. मीटरचे स्थंलात्तर आणि महावितरणची जबाबदारी याचा निर्णय सदर प्रकरणात ग्राहक तकार कमांक ०८/२००६ दि. ०४.०९.२००६ रोजी दिलेला असल्याने सध्यस्थितीत प्राप्त झालेल्या आणि दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रावरून काही बदल करणे योग्य ठरणार नाही. सध्याचा चालू असलेला वीज पुरवठा प्रचलीत नियमानुसार असल्याने तो खंडीत करण्याबाबत कोणतेही कारण स्पष्ट झालेले नाही. प्राप्त परिस्थितीत आणि संध्याच्या या प्रकरणातील वारसा हक्क आणि मालमत्ते संदर्भात असलेल्या वादाची व्याप्ती पाहता श्री. सावंत यांनी कुळाच्या वतीने दाखल केलेली तकार फेटाळण्यास योग्य ठरेल. नजीकच्या भविष्य काळात मयत ग्राहकांच्या वारसाबाबत आणि नावांतील बदलाबाबत महावितरण प्रचलित नियमानुसार कार्यवाही करण्यास बांधिल असल्याने आणि मुळ वादा हा वारसाच्या हक्कांबाबत असल्याने महावितरणला योग्य ती कृती करण्यास मुभा असणारच आहे. मयत ग्राहकांच्या नांवे अशा प्रकारे बिलाची आकारणी होणे ही बाब योग्य वाटत नाही. महावितरणने याबाबतीत योग्य ती कार्यवाही नियमानुसार

करावी असेही मंचाचे मत असून महावितरणला सुचविण्यात येत आहे की, प्रचलित नियमाच्या आधारे मयत ग्राहकांच्या नावातील बदल आणि मीटर मालकीबाबत विहीत कालावधीत कृती करणे ही संध्याची गरज आहे. श्री. दिलीप शंकर तावडे यांनी या संदर्भात आवश्यक ती कागदपत्रे दाखल केली असून प्रत्यक्ष जागेवर माहीती पुरविली असल्याने बेकायदा बाबी विषयी मंच कोणतेही भाष्य करू इच्छित नाही कारण हा विषय मंचाच्या कार्यक्षेत्रा बाहेर आहे. विज विधेयक २००३ मधील तरतुदीनुसार प्रस्तुत प्रकरणात ग्राहकांच्या हक्कांस कोणतीही बाधा आलेली नसून कोणत्याही न्याय तत्वाचे उल्लघंन झालेले दिसत नाही.

या तकार प्रकरणात वट मुखत्यार पत्र धारक आणि विरूध्द पक्षकार यानी दाखल केलेली कागदपत्रे अन्य तपशील आणि प्रत्यक्ष सुनावणी कालावधीत केलेला युक्तीवाद त्याचप्रमाणे मंचाने प्रत्यक्ष जाग्यावर केलेली पहाणी इ. विचारात घेता मंचाने वरीलप्रमाणे निष्कर्ष काढला असून सदर तकार प्रकरणात खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

# <u>आदेश</u>

**१) मयत ग्राहक रमाबाई माधवराव सावंत याचेकडील कूळ श्री. नागवेकर यांच्यावतीने वट मुखत्यार पत्रक या नात्याने सुभाष वामनराव सावंत यांनी दाखल केलेली तकार वस्तुस्थितीशी विसंगत असल्याने फेटाळण्यात येत असून संबधितानी घेतलेले आक्षेप, हरकती सुध्दा फेटाळण्यात आल्या आहेत.**

**२) मीटर कमांक ११७१, ११७२, २५७२ याचा विज पुरवठा आहे तसाच चालू ठेवण्यात यावा. संबधित वीज पुरवठयाची देयके मीटर अस्तीत्वात असलेल्या जागेवरच पाठविण्यात यावीत.**

**३) तकारीच्या खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.**

**३) तकारदाराने संबधित जागा, त्याची वाटणी, मयत ग्राहकाचे वारसदार, जागेचा होणारा वापर आणि त्यांच्या अनुषंगाचे असणारे अन्य तपशिल याबाबतीत उपस्थित केलेले विविध युक्तीवाद अन्य बाबी तसेच हरकती यांचा वीज पुरवठयाशी कोणताही संबंध नसल्याने तो नाकारण्यात येत असून तकारदार कोणत्याही खर्चास किंवा नुकसान भरपाईस पात्र ठरत नाही.**

**४) या आदेशा विरूध्द तकारदारास अपिल करावयाचे असल्यास आदेश मिळाल्यापासून ६० दिवसाचे आत अपिल करता येईल.**

**६) या आदेशाची कार्यवाही व अनुषंगीक बाबीचा अहवाल महावितरणने आदेश मिळाल्यापासून ४० दिवसात मंचाकडे पुर्तता अहवाल दाखल करावा.**

<u>पत्ता :-</u>

सचिव,
लोकपाल महाराष्ट्र राज्य
विदयुत नियमक आयोग
६०६/६०८ केशवा बिल्डींग/
बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स मुबंई ४०००५१
फोन नं. ०२२ / २६५९२९६५

| | | |
|---|---|---|
| श्री. जे. एल. सोनवणे | श्री. डि. एस. जामखेडकर | श्री. एन. ए. कुलकर्णी |
| कार्यकारी अभियंता व सचिव | अध्यक्ष | सदस्य |
| ग्राहक तक्रार निवारण मंच | ग्राहक तक्रार निवारण मंच | ग्राहक तक्रार निवारण मंच |
| कोकण परिमंडळ रत्नागिरी | कोकण परिमंडळ रत्नागिरी | कोकण परिमंडळ रत्नागिरी |

दिनांक:-
ठिकाण:- रत्नागिरी